www.bankofbaroda.com

बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda
भारत का अंतर्राष्ट्रीय बैंक

कॉर्पोरेट कार्यालयः बडोदा कॉर्पोरेट सेंटर, सी–26, ''जी'' ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई 400 051

# रेकॉर्ड तारखेसाठी नोटिस

## विजया बँक आणि देना बँक यांचे बँक ऑफ बडोदाशी एकत्रीकरण

हे "विजया बँक आणि देना बँक यांच्या बँक ऑफ बडोदा योजना 2019 च्या एकत्रीकरणाशी" संबंधित असून भारत सरकारने बँकिंग कंपन्या कायदा (उपक्रम संपादन आणि हस्तांतरण) 1970/1980 च्या कलम 9 अन्वये दि. 2 जानेवारी 2019 रोजी दिलेल्या अधिसूचनानुसार करण्यात येत आहे.

याद्वारे नोटिस देण्यात येते की बँक ऑफ बडोदाच्या संचालक मंडळाने दि. 20 फेब्रुवारी 2019 रोजी झालेल्या आपल्या सभेत, या योजनेच्या अन्वये **सोमवार दि. 11 मार्च 2019 हा दिवस बँक ऑफ बडोदा (जिच्यामध्ये हस्तांतरण होत आहे ती बँक) हिचे समभाग विजया बँक आणि देना बँकांच्या (हस्तांतरित होणाऱ्या बँका) भागधारकांना जारी आणि वाटप करण्यासाठी रेकॉर्ड दिवस म्हणून निश्चित केला आहे.** त्यासाठी खाली नमूद केल्यानुसार शेअर एक्स्चेंज रेशो (भाग देवाणघेवाण प्रमाण) निश्चित केले आहेः

1. विजया बँकेच्या रु. 10/–च्या प्रत्येक 1000 समभागांसाठी बँक ऑफ बडोदाचे रु. 2/–चे 402 समभाग
2. देना बँकेच्या रु. 10/–च्या प्रत्येक 1000 समभागांसाठी बँक ऑफ बडोदाचे रु. 2/–चे 110 समभाग,

त्यानुसार हस्तांतरित होणाऱ्या बँकांच्या ज्या भागधारकांची नावे संबंधित भागधारकांचे रजिस्टर/लाभार्थी मालकांचे रजिस्टर यामध्ये रेकॉर्ड तारखेच्या दिवशी आढळतील ते हस्तांतरण ज्यामध्ये होत आहे त्या बँकेचे समभाग, उपरोक्त केलेल्या एक्स्चेंज रेशोनुसार मिळण्यास पात्र असतील.

ज्या बँकांचे हस्तांतरण होत आहे त्यांच्या भागधारकांना (अ) त्यांच्या समभागांचे हस्तांतरण किंवा (ब) त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यामध्ये बदल करणे इत्यादी करायचे असल्यास त्यांनी तशी विनंती रजिस्ट्रार आणि ट्रान्स्फर एजंट (RTA) म्हणजे लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरित होणाऱ्या बँकांचे आरटीए) यांच्याकडे खालील पत्त्यावर रेकॉर्ड तारखेस किंवा त्यापूर्वी मिळेल अशा प्रकारे पाठवावी.

लिंक इनटाइम इंडिया प्रा. लि.
सी 101, 247 पार्क,
एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी पश्चिम,
मुंबई – 400 083
फोनः 022–49186270
ई–मेलः rnt.helpdesk@linkintime.co.in

रेकॉर्ड तारखेनंतर हस्तांतरित होणाऱ्या बँकांच्या संदर्भातील सर्व पत्रव्यवहार, फक्त हस्तांतरण होणाऱ्या बँकेच्या **रजिस्ट्रार व ट्रान्स्फार एजंटशी म्हणजे कार्वी फिनटेक प्रायव्हेट लिमिटेड, खालील पत्त्यावर करावाः**

कार्वी फिनटेक प्रायव्हेट लिमिटेड (युनिटः बँक ऑफ बडोदा)
कार्वी सेलेनियम टॉवर बी, प्लॉट 31–32, गचिबोवली
फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, सेरिनिंगमपल्ली मंडल,
हैदराबाद – 500 032
फोनः 040 6716 2222/18003454001 (टोल फ्री)
ई–मेलः einward.ris@karvy.com

या योजनेच्या कलम 6(2)(i) अन्वये हस्तांतरण होणाऱ्या बँकांचे भागधारक जे अपूर्णांक स्थितीतील समभागांसाठी पात्र आहेत त्यांना सदर अपूर्णांक समभागांद्वारे मिळणारी रक्कम, ह्या हस्तांतरण होणाऱ्या बँकांच्या डिपॉझिटरीजद्वारे जी माहिती उपलब्ध करून दिली जाईल त्याद्वारे किंवा आरटीएकडे जी नोंदणी झाली असेल त्यानुसार थेट त्यांच्या बँक खात्यावर किंवा त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर वॉरंट्सद्वारे पाठविण्यात येईल.

रेकॉर्ड तारखेच्या अनुसंगाने, हस्तांतरण होणाऱ्या बँकांच्या समभागांचे ट्रेडिंग केल्यास ते बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांच्याद्वारे स्टॉक एक्स्चेंजच्या निकषांनुसार रद्दबातल ठरेल.

रेकॉर्ड तारखेची नोटिस व त्यासोबत योजनेची माहिती/नोटिस बँकेच्या **www.bankofbaroda.com** या वेबसाईटवर तसेच बीएसई लिमिटेडच्या (www.bseindia.com) आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज लिमिटेडच्या (www.nseindia.com) ह्या वेबसाईटवर जिथे बँकेचे भाग सूचीबद्ध आहेत तिथेही उपलब्ध आहे.

**पी.के. अग्रवाल**
**कंपनी सेक्रेटरी**
**बँक ऑफ बडोदा**

**स्थळः मुंबई**
**तारीखः 22 फेब्रुवारी 2019**

88/18-19